ePaper

## लोकसभा निवडणुकीत आ. जयंत पाटील यांनी घेतल्या तब्बल 103 सभा!



| वर्ष - 7 | अंक - 330 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 21 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- प्लेऑफ्स सामन्यांसाठी दिवस आहे का?
- रोहित शर्मा खोटं बोलला?
- नेत्रा करणार अस्तित्वाचा शेवट
- 49 जागांसाठी 56.68% मतदान

## पिंपरी- चिंचवड महापालिकेची मोहीम

# बेकायदा होर्डिंगवर “बुलडोझर”!

### दुर्घटना टाळण्यासाठी सतर्कता: पहिल्याच दिवशी पाच ठिकाणी कारवाई

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत जाहिरात फलक निष्कासनाची कारवाई आजपासून सुरू करण्यात आली असून ‘इ’ क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील एकूण ५ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच येत्या तीन दिवसांत शहरातील उर्वरित अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने शहरातील जाहिरात फलकांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणामध्ये आतापर्यंत अ (३), ब (५), क (३), ड (२), इ (५), फ (६) असे मिळून क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण २४ अनधिकृत फलक आढळले असून वाढीव ३२१ जाहिरात फलक आढळले आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातील होर्डिंग्सबाबत महापालिका अधिकारी, जाहिरात फलक धारक यांच्यासमवेत शुक्रवार १७ मे रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत आयुक्त शेखर सिंह यांनी फलकधारकांना अनधिकृत जाहिरात फलक दोन दिवसात हटविण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांना पुढील कारवाई करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनधिकृत फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या, या कारवाईस आजपासून सुरूवात झाली. ३०X२० चे २ फलक ४०X२० चे २ फलक १५X२० चा १ फलक असे एकूण ५ फलक आजच्या कारवाईत निष्कासित करण्यात आले. या कारवाई दरम्यान सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त संदीप खोत, कार्यालय अधिक्षक ग्यानचंद भाट, परवाना निरीक्षक, मजूर, एमएसएफ जवान तसेच महापालिका सुरक्षा रक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

### 2 कनिष्ठ संरचना अभियंत्यांची करण्यात येणार नेमणूक

शहर अभियंता कार्यालयामार्फत स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेटचा नमुना तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच फलक उभारण्यात आलेल्या जागेवर पाहणी करण्यासाठी २ कनिष्ठ संरचना अभियंत्यांची नेमणूक महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. यामुळे जाहिरात फलकाच्या संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासही मदत होणार आहे.

### 31 मे 2024 पर्यंत होर्डिंग्स परवानाचे नूतनीकरण करावे अन्यथा कारवाई

२०२४-२५ साठी होर्डिंग्स परवाना नूतनीकरण ३१ मे २०२४ पर्यंत करावे अन्यथा सदरचे होर्डिंग्स अनधिकृत समजून निष्कासनाची कारवाई करण्यात येईल अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

क्षेत्रीय अधिकाऱ्यांना फेरपडताळणीबाबत सूचना

आज सकाळी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आकाशचिन्ह परवाना विभाग, शहर अभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत बैठक झाली.

त्यावेळी त्यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी बुधवारपर्यंत आपआपल्या प्रभागातील अनधिकृत होर्डिंग्सचे सर्वेक्षण करण्याच्या व फेरपडताळणी करण्याच्या सूचना दिल्या.

## शाहूनगरला एका फ्लॅटमध्ये आग लागून घरगुती साहित्य जळून खाक

### सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, अग्निशमक दलाची तत्परता

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शाहूनगर येथे एका फ्लॅटमध्ये आग लागून घरगुती साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना आज सोमवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली. आग लागल्याची माहिती मिळताच चिखली उप अग्नीशमन पथक, पिंपरी अग्निशमन पथक, प्राधिकरण अग्निशमन पथक, तळवडे अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले होते.

आग लागल्याचे समजताच आर्यनम सोसायटीतील रहिवासी खाली आले. इमारतीमधील इतरांच्या घरात आलेल्या धुरास



दारे, खिडक्या उघडून वाट करून दिली. तसेच ज्या घराला आग लागली होती त्यातून दोन गॅस सिलेंडर बाहेर काढल्याने पुढील अनर्थ टळला. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. मात्र शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. ज्या घरात आगीची घटना घडली त्यामध्ये एक ज्येष्ठ महिला राहत होती. मात्र आग लागल्याचे समजताच त्यांनी इतरांना सावध करीत इमारतीबाहेर आल्या होत्या.

### गोरखे यांनी यांचे आयुक्तांना निवेदन

शाहूनगर, संभाजीनगर पूर्णानगर परिसरात अग्निशामक केंद्र तातडीने सुरू करावे अशी मागणी भाजपचे पिंपरी विधानसभा निवडणुक प्रमुख अमित गोरखे यांनी केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना गोरखे यांनी यासंदर्भात निवेदन दिले आहे. गेल्या सहा महिन्यात या ठिकाणी ४ मोठ्या आगीच्या घटना घडलेल्या आहेत. पूर्णानगर मध्ये तर फर्निचरचे दुकान जागीच खाक होऊन चार जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना अजूनही ताजी आहे.

# शिक्षण विभागाचा अजब फतवा!

## शाळेकडे फिरकत नसल्याने योजना कागदोपत्रीच चालणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षण विभागाने दुष्काळी तालुक्यातील शाळांमध्ये उन्हाळी सुट्टीतही ‘मध्यान्ह भोजन योजना’ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, योजनेव्दारे कोरडा शिधा वाटण्याऐवजी आहार शिजवून देण्याचा अनाकलनीय फतवा काढला आहे.**



प्रवासी १ जूनपासून व्हॉट्सॲप हेयामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांना वेठीस धरले गेले असून विद्यार्थ्यांच्या सुटीचाही बेरंग झाला आहे. केवळ खिचडीसाठी विद्यार्थी शाळेकडे फिरकत नसल्याने योजना कागदोपत्रीच चालणार आहे.पुणे, सातारा, सोलापूर, बीड, लातूर, धाराशिव, कोल्हापूर, सांगली, छ. संभाजीनगर, नाशिक, जालना, बुलढाणा, जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये मध्यान्ह भोजन देणारी ‘प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना’ राबविण्यास सुरूवात झाली आहे. यासाठी मे आणि जून महिन्यात विद्यार्थ्यांना शाळास्तरावर शिजविलेला आहार उपलब्ध करून देण्याचे आदेश ३ मे रोजी काढले आहेत. शाळा भरेपर्यंतच्या ऐन सुटीत विद्यार्थ्यांना शाळेवर बोलविण्याचा आणि किमान एका शिक्षकाने उपस्थित राहून स्वयंपाकी महिलेच्या मदतीने पोषण आहार शिजवून देण्याचा अजब फतवा निघाला आहे. ‘वरून’ आलेल्या या फतव्यामुळे शिक्षक, पालक आणि अधिकारीही हतबल पहायला मिळत आहेत.उन्हाळी सुटीत अनेक विद्यार्थी परगावी गेलेले असतात तर अनेकांचे खेळणे, पोहणे, फिरणे, छंदवर्ग सुरू असतात. शिक्षकांचीही सुट्टीतली आपापली नियोजने असताना त्यांनाही शाळेत थांबवले आहे. विशेषतः विद्यालयांमध्ये मोठा पट असतो तेवढी मुले आणि शिक्षक कसे बोलवायचे याच तणावात मुख्याध्यापक आहेत. त्यामुळे शिजवून अन्न देण्याची योजना केवळ कागदावर गुंडाळली जाणार आहे. पालक ॲड. नवनाथ भोसले म्हणाले, “शिक्षक विद्यार्थ्यांना सूचना देत आहेत पण विद्यार्थी ऐन सुटीत केवळ खिचडीसाठी कसे येतील? नऊ-दहापासूनच उन्हाचा तीव्र चटका बसत आहे. मुले यापासून वंचितच राहणार. खरीच कळकळ असेल तर कोरडा शिधा द्या.” एक शिक्षक म्हणाले, “मुलं शाळेत कशी आणायची तेच समजत नाही. तांदूळ शिल्लक राहिला तरी कारवाई आणि रोजच्या रोज शिजविला जातोय असं दाखविलं तरी कारवाई. काही शाळांवर तर अजून तांदूळच पोचलेला नाही.

### कोरडा शिधा वाटप करावा

प्राथमिक शिक्षक संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब मारणे म्हणाले, “संघटनांनी आहार शिजवून देण्याऐवजी कोरडा शिधा वाटप करावा अशी मागणी केली आहे. निदान मुलांच्या मानसिकतेचा विचार करून निर्णय घ्यायला हवा होता. शिधा वाटपाचा निर्णय न झाल्यास नव्या शैक्षणिक वर्षात सर्व अशैक्षणिक कामे आणि संपूर्ण पोषण आहार योजनेवर बहिष्कार टाकला जाईल.

# पबच्या संख्येबाबत महापालिकाही अनभिज्ञ

## ‘रूफटॉप’ हॉटेल्सवर कारवाईचे मनपाकडून पोलिसांना पत्र

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याणीनगर येथे झालेल्या भीषण अपघातानंतर शहरातील पबचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच पबच्या संख्येची कोणतीही नोंद महापालिकेकडे नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बांधकाम नियमानुसार केवळ रेस्टॉरंट सुरू करण्यास महापालिका मान्यता देते. त्यामुळे तेथे पब सुरू आहे की नाही, याची माहिती नाही.**




पबची माहिती पोलीस किंवा जिल्हा प्रशासनाकडे असेल, असे सांगत महापालिका प्रशासनाने हात झटकण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

रूफटॉप हॉटेलची माहितीची नोंद असून अनधिकृत रूफटॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यासंदर्भात जानेवारी महिन्यातच पोलिसांना पत्र दिल्याचेही महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.कल्याणीनगर भागातील पबमधून निघालेल्या तरुण-तरुणीला भरधाव मोटारीने रविवारी पहाटे धडक दिल्याने तरुण-तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पबची संख्या किती यासंदर्भात महापालिकेकडे माहिती घेतली असताना पबची कोणतीही नोंद नसल्याचे पुढे आले. पबची स्वतंत्र नोंद ठेवली जात नाही. रेस्टारंट सुरू करण्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर महापालिका परवानगी देते. त्यामुळे तेथे काय सुरू आहे, याची माहिती महापालिकेकडे नाही, असा दावाही करण्यात आला. रूफटॉप हॉटेल्सची आकडेवारी महापालिका प्रशासनाकडे आहे. शहरात एकूण ८९ अनधिकृत रूफटॉप हॉटेल्स आहेत. त्यापैकी ७ हॉटेल्सना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९४९ चे कलमअंतर्गत नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. यातील ५३ रूफटॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यात आली आहे. तर, सहा हॉटेल मालकांनी स्वत:हून बांधकाम काढून घेतले आहे. सात हॉटेल्सचा वापर बंद असून, सात रूफटॉप हॉटेल्सबाबत स्टे ऑर्डर देण्यात आली आहे. तर नऊ हॉटेल्सवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून देण्यात आली.शहरातील अनधिकृत रूफटॉप हॉटेल्ससंर्भात कारवाई करावी, असे पत्रही महापालिकेच्या बांधकाम विभागाने जानेवारी महिन्यात पोलिसांना दिले आहे. अस्तित्वातील अधिकृत इमारतीच्या टेरेसचा वापर आणि अनधिकृत रूफटॉप किंवा टेरेस हॉटेल्ससाठी होत आहे. इमारतीच्या दर्शनी बाजूच्या सामासिक अंतरामध्ये तात्पुरत्या कच्च्या, पक्क्या स्वरूपाचे पत्राशेड टाकून तर काही ठिकाणी इमारतीच्या पार्किंगमध्ये तसेच निवासी मिळकतींच्या वापरात बदल करून हॉटेल्स सुरू करण्यात आले आहेत. हॉटेल्ससाठी पार्किंगबाबतही पूर्तता करण्यात आली नसल्याने रस्त्यावर वाहने लावली जात असून वाहतूक कोंडीचा प्रश्नही निर्माण होत आहे. तर मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपकांचा वापर होत असल्याने ध्वनी प्रदूषण होत आहे. त्यामुळे अनधिकृत हॉटेल्सवर कारवाई करावी, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.पबची माहिती पोलीस किंवा जिल्हा प्रशासनाकडे असेल, असे सांगत महापालिका प्रशासनाने हात झटकण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

### तरुण-तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना

रूफटॉप हॉटेलची माहितीची नोंद असून अनधिकृत रूफटॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यासंदर्भात जानेवारी महिन्यातच पोलिसांना पत्र दिल्याचेही महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.कल्याणीनगर भागातील पबमधून निघालेल्या तरुण-तरुणीला भरधाव मोटारीने रविवारी पहाटे धडक दिल्याने तरुण-तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

# सीएनजी गॅस पुरवठा विस्कळित!

## पंपावर वाहनांच्या रांगा, चारचाकी, रिक्षाचालकांच्या व्यवसायावर यांचा परिणाम

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहर व उपनगरातील सीएनजी गॅस (एमएनजीएल) तांत्रिक दुरुस्तीमुळे रविवारी (ता.१९) पुरवठा विस्कळित झाल्याने सीएनजी पंपावर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे २५ ते २६ सीएनजी पंपांचा पुरवठा विस्कळित झाला. त्यामुळे सुरु असणाऱ्या सीएनजी पंपावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्याचे चित्र रविवारी (ता.१९) पासून ते सोमवारी दिवसभर पाहायला मिळाले.**



चारचाकी, रिक्षाचालक यांच्या व्यवसायावर यांचा परिणाम झाल्याचे रिक्षा चालकांकडून सांगण्यात आले. जुनी सांगवी परिसरातील दोन्ही पंपावर पुरवठा नसल्याने परिणामी सांगवी परिसरातील रिक्षाचालक, व सीएनजी वाहनधारकांना इतर पंपावर जावे लागल्याने गर्दी झाली.

सांगवी परिसरातील पुरवठा विस्कळित झाल्याने कासारवाडी, फुगेवाडी, येथील पंपावर मोठ्या रांगा लागल्या होत्या. चिंचवड येथे तांत्रिक दुरुस्तीची कामे सुरू असून सोमवारी (ता.२०) रात्रीपर्यंत हे काम चालणार असून मंगळवार (ता.२१) पुरवठा सुरू होईल असे एमएनजीएलकडून सांगण्यात आले आहे.

### नागरिकांना सहन करावा लागला त्रास..

केटरिंग साहित्य पुरवठा करणाऱ्या रिक्षाचालक, सांगवी भागातून भोसरी पिंपरी येथे शेअरिंग रिक्षाने नियमित कामाला जाणाऱ्या कामगार वर्गास रिक्षा उपलब्ध नसल्याने त्रास सहन करावा लागत आहे. घरगुती खानावळ, डबे पोचवण्यासाठी रोज ठरलेल्या रिक्षा सीएनजीमुळे अडकल्याने खानावळ चालकांची तारांबळ उडाल्याचे चित्र पाहावयास मिळाले. नियमित ठरलेल्या रिक्षा चालकांना रुग्ण ने-आण करण्याकरिता पर्यायी गाड्यांचा आधार घ्यावा लागला.

सांगवीतील पंपावर सीएनजी गॅस नसल्याने पर्यायी कासारवाडी येथे जावे लागले. उन्हाचा चटका व मोठ्या रांगामुळे वेळ गेला. **–सुधीर शिंदे , रिक्षा चालक**

शहरातील चिंचवड येथे तांत्रिक दुरुस्तीसाठी सीएनजी गॅसच्या वाहिन्यांचा पुरवठा बंद करण्यात आलेला आहे. हा नियमित कामाचा भाग आहे. सोमवार (ता.२०) रात्रीपर्यंत दुरुस्ती होईल. मंगळवारी (ता.२१) पहाटेपर्यंत पुरवठा सुरळीत सुरू होईल.” **– जित रुईकर, मार्केटिंग व्यवस्थापक एमएनजीएल**

रोज नियमित भाजीपाला व इतर साहित्य आणण्यासाठी खडकी व पुण्यात रिक्षाने प्रवास करावा लागतो. कायम ठरलेली रिक्षा असते. कालपासून सीएनजी गॅस नसल्याने पर्यायी वाहनांचा उपयोग करावा लागला. **–विद्या जाधव, खानावळ चालक.**

# आपण जे नाटक पाहतो त्यात खूप समाधानः अलका कुबल-आठल्ये

## नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नाटकाशी माझी नाळ जोडलेली आहे. आपण जे नाटक पाहतो त्यात खूप आनंद आणि समाधान मिळून जाते, असे प्रतिपादन अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये यांनी केले.**



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त येथील गोळवलकर मैदान येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ‘कला गौरव पुरस्कार’ महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम विशाखा सुभेदार व पंढरी कांबळे यांना अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार सुनील शेळके, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे, पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष जनार्धन रणदिवे, नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, नाट्य परिषद तळेगाव शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे, बबनराव भेगडे, गणेश काकडे, विलास काळोखे, संग्राम जगताप, बसवराज पाटील, ॲड.सुभाष मोहिते, सरदार याज्ञसेनी दाभाडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अलका कुबल – आठल्ये म्हणाल्या, की नाट्य परिषदेने कला गौरव पुरस्कारासाठी नेमक्या व्यक्तींची निवड केली आहे. विशाखा सुभेदार व पंढरी कांबळे यांनी रसिकांना भरभरून हसविले आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान केल्याने मनाला समाधान मिळाले आहे.

भाऊसाहेब भोईर म्हणाले, की शहराची प्रसिद्धी किती इन्फ्रास्ट्रक्चर आहे, यावर नसते; तर सांस्कृतिक वातावरण कसे आहे, यावर अवलंबून असते. कलापिनी, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद या संस्थामुळे तळेगावच्या नवलौकिकात मोठी भर पडली आहे. दरम्यान, नाट्य परिषदेचे सल्लागार चंद्रकांत भिडे यांना अमृत महोत्सवानिमित्त जीवनगौरव पुरस्कार, तर नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष नितीन शहा व नाट्य परिषदेचे आधारस्तंभ ज्येष्ठ रंगकर्मी अभय लिमये यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तत्पूर्वी, मधुसूदन ओझा प्रस्तुत रजनीगंधा हा हिंदी मराठी गाण्यांच्या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

पुरस्काराला उत्तर देताना पंढरीनाथ कांबळे म्हणाले, की या पुरस्कारामुळे मोठी जबाबदारी वाढली आहे. विशाखा सुभेदार यांनी सांगितले, नाट्य परिषद हे माझे माहेर आहे. उतारवयामध्ये कलाकारांना साथ द्याल, ही अपेक्षा आहे. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे यांनी, सूत्रसंचालन डॉ. विनया केसकर यांनी, तर आभार प्रसाद मुंगे यांनी मानले.

### आ.शेळके व बापूसाहेब भेगडेंमध्ये रंगला कलगी तुरा..

नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे यांनी प्रास्ताविकात तळेगावमध्ये नाट्यगृह व्हावे, ही अनेक वर्षांची मागणी असल्याचे सांगितले. हाच धागा पकडून ‘नाट्य परिषदेचा २१ वा वर्धापनदिन नाट्यगृहामध्येच साजरा होईल, असा विश्वास आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केला. यावर बापूसाहेब भेगडे यांनी नाट्यगृह हे आधीच झाले असते, परंतु आमदार शेळके यांच्या विरोधामुळेच नाट्यगृह झाले नसल्याचे सांगितले. यावर शेळके यांनी ‘माझं नाव न घेता ते बीजेपी वाले असे म्हणा, कारण आता मी तुमच्या पक्षात आलो आहे.




**महाराष्ट्रात चार हजार बंधारे कोरडे पडले आहेत. नद्याही कोरड्या पडल्या आहेत. जलाशयातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. सर्वाधिक प्रभावित प्रदेशांमध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागाचा समावेश आहे. महाराष्ट्र आणि पंजाबसारख्या राज्यांमध्ये ऊसासारखी पाण्याची जास्त गरज असलेली पिके घेतली जातात. भारतातील जलसंकटाकडे सरकार आणि राजकीय पक्षांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.**

# पाणीटंचाईचे संकट; धोक्याचा इशारा!



जगातील एकूण लोकसंख्येपैकी १७ टक्के लोक भारतात राहतात; पण जगातील फक्त चार टक्के गोड्या पाण्याचे स्रोत येथे आहेत. देशाच्या १४० कोटी लोकसंख्येपैकी ३५ कोटी लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही. कर्नाटकची राजधानी असलेल्या बंगळुरूमध्ये गेल्या महिनाभरापासून पाण्याचे संकट जाणवत आहे. तिथे आता टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. एका अहवालानुसार येथील १४,७०० पैकी ६०९९७ कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. बंगळुरूच्या दीड कोटी लोकांना दररोज किमान दोन अब्ज लिटर पाण्याची आवश्यकता असते. त्यापैकी सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त पाणी कावेरी नदीतून येते. कावेरी खोऱ्याच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कमी झाल्यामुळे बंगळुरूला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या बंगळुरूचे मुख्य जलाशय असलेल्या केआरएस धरणात त्याच्या क्षमतेच्या २८ टक्क्यांपेक्षा पाणी कमी आहे. एकेकाळी हिरव्यागार असलेल्या या भागात आता आयटी पार्क आणि उंच इमारती बांधल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याची क्षमता खूपच कमी झाली आहे. स्वच्छतेसाठी पुरेसे पाणी मिळत नसल्याने त्यांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. टँकरमधून पाणी भरण्यासाठी लोक लांबच लांब रांगा लावताना दिसत आहेत. 'नीती'आयोगाच्या अहवालानुसार कोट्यावधी लोक तीव्र पाणीटंचाईचा सामना करत असून अनिश्चित मान्सूनमुळे पाणीटंचाईची समस्याही गंभीर होत आहे. महाराष्ट्रात चार हजार बंधारे कोरडे पडले आहेत. नद्याही कोरड्या पडल्या आहेत. जलाशयातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. सर्वाधिक प्रभावित प्रदेशांमध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागाचा समावेश आहे. महाराष्ट्र आणि पंजाबसारख्या राज्यांमध्ये ऊसासारखी पाण्याची जास्त गरज असलेली पिके घेतली जातात. देशातील २२ टक्के ऊस एकट्या महाराष्ट्रात पिकतो. पंजाबमधील भातशेतीच्या सिंचनासाठी वापरण्यात येणारे ऐंशी टक्के पाणी भूजल स्रोतांमधून येते. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पंजाब या औद्योगिक राज्यांमध्येही पाण्याची पातळी दहा वर्षांच्या सरासरीपेक्षा कमी आहे. पाण्याची अशी टंचाई असतानाही केंद्र सरकार पाण्याचा जास्त वापर करणारी पिके परदेशात निर्यात करून पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय करत आहे. म्हणजे एखादे पीक पिकवण्यासाठी जेवढे पाणी वापरले जाते, तेवढेच पाणी निर्यातीच्या माध्यमातून देशाबाहेर जाते. देशात पाणीटंचाई कायम राहिल्यास उद्योग आणि शहरीकरणावरही त्याचा परिणाम होईल. त्यामुळे भारताचे आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार होण्यास अडथळे येऊ शकतात. भारतातील जलसंकटाकडे सरकार आणि राजकीय पक्षांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कारण पाणी हा जीवनाचा आधार आहे. पाणी हा राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका आहे पण या मुद्द्यावर राजकीय पक्षांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे दिसून येते. पाण्याच्या कमतरतेमुळे लोकांच्या आरोग्यावर, शेतीवर आणि अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. प्राप्त परिस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्यांमध्ये मात्र सध्या गंभीर होत असलेल्या पाणीप्रश्नाकडे लक्ष दिलेले नाही. देशातील जलसंकटाला तोंड देण्यासाठी राजकीय पक्षांना आपल्या जाहीरनाम्यात अनेक घोषणा करता आल्या असत्या. नवीन जलाशय म्हणजेच धरणे बांधणे, पावसाचे पाणी साठवून त्याचा योग्य वापर करणे, कमी पाण्यात होणाऱ्या शेतीचे तंत्र विकसित करणे, प्रदुषित पाणी स्वच्छ करून त्याचा पुनर्वापर करणे, पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी काही निर्णय घेणे या अशा काही महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश करून त्याकडे गांभीर्याने लक्ष दिल्यास भविष्यात जलसंकटाला तोंड देणे सोपे होऊ शकते.

## संपादकीय »

### कानउघडणी!

***मतदानाचा सांख्यिकी तपशील प्रसृत करण्यास दहा-दहा दिवस लावल्याने निवडणूक आयोगाच्या हेतूंविषयीच संशय निर्माण होतो, हे न्यायालयानेही सुनावले..***

सामान्य नागरिक, लहानसा सरकारी अधिकारी वा कनिष्ठ पोलीस यांच्यापेक्षा सर्वोच्च न्यायालय जेव्हा घटनात्मक यंत्रणांना फटकारते तेव्हा त्याचे महत्त्व आणि समाधानही, काही वेगळेच असते. सद्य:स्थितीत हे समाधान निवडणूक आयोग आणि राज्यपाल या दोन यंत्रणा मुबलकपणे नागरिकांस देताना दिसतात. त्याचे श्रेय भाजपचे. वास्तविक शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची अखंड पैदास असलेला पक्ष आणि पुढच्या पिढीची वा शंभर वर्षांनंतरच्या भारताची चिंता वाहणारे विचारकुल असतानाही भाजप राज्यपालपदासारख्या महत्त्वाच्या स्थानी हे असले एकापेक्षा एक गणंग का नेमतो हा प्रश्नच. असो. तूर्त सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि राज्यपाल यांवर ओढलेल्या कोरडय़ांबाबत. गेल्या आठवडय़ात दोन स्वतंत्र प्रकरणांत या दोन यंत्रणांना सर्वोच्च न्यायालयाने त्यांची जागा दाखवून दिली.

राज्यात भाजपच्या महायुतीला एकतर्फी यश मिळणार नाही... महाविकास आघाडीचे उमेदवार चांगल्या संख्येने निवडून येतील... राज्यात प्रचारासाठी फिरताना शेतकरी व तरुण वर्गाची भाजपबद्दलची नाराजी स्पष्टपणे जाणवत होती, याचा अंदाज आल्यानेच पंतप्रधान मोदी यांच्याकडून विखारी प्रचार सुरू झाला आहे...!

## महाविकास आघाडी'चा पहिला प्रयत्न 2014 साली




लोकसभा निकालानंतर देशातील राजकीय चित्र नक्कीच बदलेल... अशी मते राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी 'लोकसत्ता लोकसंवाद' कार्यक्रमात व्यक्त केली. त्यांच्याशी झालेला संवाद:राज्यात शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडीचा प्रयोग २०१९ मध्ये केला व आम्ही अडीच वर्षे सरकार चालविले. पण हा प्रयोग २०१४ मध्येही करण्याचा माझा प्रयत्न व नियोजन होते. पण ते यशस्वी झाले नाही. त्या वेळी निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर भाजपने न मागता मी भाजपला बिनशर्त पाठिंबा देण्यामागे शिवसेनेला भाजपबरोबर जाण्यापासून रोखायचे होते. भाजप आणि शिवसेनेत अंतर पाडण्याचा आमचा प्रयत्न होता. त्याच वेळी राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेस असे तीन पक्षांचे सरकार स्थापन करण्याचा २०१४ मध्ये माझा प्रयत्न होता. पण उद्धव ठाकरे यांनी भाजपबरोबर जाण्याचा तेव्हा निर्णय घेतला. उद्धव ठाकरे यांना भाजप अधिक जवळचा वाटला. शिवसेना भाजपबरोबर सत्तेत सहभागी झाली आणि महाविकास आघाडीचा प्रयोग तेव्हा फसला. शिवसेनेकडून अडवणूक सुरू झाल्याने भाजपने आमच्याशी संपर्क साधला. शिवसेना – भाजपमध्ये वितुष्ट निर्माण व्हावे म्हणूनच मी शिवसेनेला सरकारमध्ये बरोबर ठेवण्यास विरोध केला होता. 'माझा भाजप सरकारमध्ये शिवसेनेला सामील करण्यास २०१७ मध्ये विरोध होता आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तीन पक्षांचे सरकार हवे होते,' या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा सत्य नाही. मी २०१४, २०१७ व २०१९ मध्ये भाजपबरोबर सत्तेत जाण्यासाठी अजित पवार यांना पुढे करून आणि स्वत:ही चर्चा करून नंतर माघार घेतली व अजित पवार यांना तोंडघशी पाडले, हे दावेही खोटे आहेत. उलट माझा मोदी व भाजपबरोबर सत्ता सहभागासाठी विरोध होता.सुप्रिया सुळे यांना राष्ट्रीय राजकारणात आणि अजित पवार यांना राज्याच्या राजकारणात जबाबदारी देण्याचा प्रस्ताव प्रफुल पटेल यांनी दिला होता, पण मी तो स्वीकारला नाही, या म्हणण्यात तथ्य नाही. सुप्रिया यांना फक्त खासदारकी दिली असून त्या लोकसभेतील पक्षाच्या गटनेता आहेत आणि आतापर्यंत दिल्लीच्या राजकारणातच आहेत. त्यांना कधीही सत्तापद देण्यात आलेले नाही. मात्र अजित पवार यांना कायमच सत्तापदे दिली. राज्यमंत्रीपदापासून अनेक कॅबिनेट मंत्रीपदे, महत्त्वाची खाती, तीन वेळा उपमुख्यमंत्रीपद, विधिमंडळातील गटनेतेपद, विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद हे सर्वकाही देण्यात आले. मी मुलगी आणि पुतण्या असा भेद कधीही केला नाही. सत्तेत असल्याशिवाय जनतेची कामे करता येत नाहीत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सचिनच्या अंगरक्षकाची आत्महत्या?

## बच्चू कडू यांचे सचिन तेंडुलकरच्या विरोधात पुन्हा आंदोलन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ऑनलाइन रमीच्या व्यसनातूनच सचिन तेंडुलकरच्या अंगरक्षकाची आत्महत्या झाल्याचा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. "ऑनलाइन गेममुळे तेंडुलकर यांच्या अंगरक्षकानं आत्महत्या केली. हे निषेधार्थ आणि संताप आणणारं आहे. सचिन तेंडुलकर यांनी ऑनलाइन रमीची जाहीरात बंद करावी किंवा भारतरत्न पुरस्कार सोडावा. नाही तर ६ जून शिवराज्यभिषेक दिनाच्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी ७ जून सचिन तेंडुलकर यांच्या घरासमोर त्यांचा पुतळा जाळून आंदोलन करणार", कडू यांनी पुन्हा एकदा दिले आहे. कडू यांनी सचिन तेंडुलकरच्या विरोधात आंदोलन केले होते.**

बच्चू कडू माध्यमांशी बोलताना म्हणाले की, जो अंगरक्षक सचिन तेंडुलकरचे जीव वाचविण्याचे काम करत होता, त्याच अंगरक्षकाला सचिन करत असलेल्या जाहिरातीमुळे जीव गमवावा लागला आहे. अंगरक्षकाला आत्महत्या करायची वेळ अली असेल तर सचिन तेंडुलकरने ही जबाबदारी उचलली पाहीजे. ज्याला भारतरत्न म्हणून आपण गौरविले, त्याच्या जाहिरातीमुळे अशी आत्महत्या करावी लागत असेल तर हे दुर्दैव आहे.



भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या सुरक्षा व्यवस्थेतील राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) अंगरक्षक जवानाने १५ मे रोजी पहाटे जामनेर येथील निवासस्थानी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. गेल्या १५ वर्षांपासून राज्य राखीव पोलीस दलाच्या सेवेत असलेले प्रकाश कापडे (३९) यांनी याआधी मंत्री छगन भुजबळ, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याकडेही सुरक्षाव्यवस्थेतील अंगरक्षक म्हणून काम केले होते. सध्या ते सचिन तेंडुलकरच्या मुंबई येथील निवासस्थानी सुरक्षाव्यवस्थेत अंगरक्षक म्हणून तैनात होते. आठवडाभरापूर्वी ते जामनेर येथील गणपतीनगर भागातील आपल्या निवासस्थानी परतले होते. कापडे यांनी आत्महत्या केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला होता. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर आणइ तपासानंतर कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले होते. कापडे यांच्यामागे आई-वडील, पत्नी, दोन मुलगे असा परिवार आहे. कापडे हे गोरेगाव (मुंबई) येथे राज्य राखीव पोलीस दलात (एसआरपीएफ) प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. बच्चू कडू लोकसभा निवडणुकीबाबत बोलताना म्हणाले की, ही निवडणूक धर्मयुद्धासारखी लढली गेली. धर्म आणि जातीच्या नावावर निवडणुका लढल्या जात आहेत. सर्व मतदारसंघावर नजर मारली तर जातीचे गणित मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी हा प्रयत्न केला. मुळ मुद्द्यांपासून ही निवडणूक दूर गेली आहे. आजही मुंबईत सहा ते सात लाख लोकांना फुटपाथवर झोपावं लागतं आणि ६ हजार एकर जमीन सहा कुटुंबाकडे आहे. हा मुद्दादेखील निवडणुकीत यायला हवा होता. पण तो आला नाही. या विषयावर जून महिन्यात गोदरेजच्या मैदानावरच आंदोलन करणार आहोत. गोदरेज कुटुंबियांना ही जमीन ब्रिटिशांकडून मिळाली होती. त्यांनी ती जमीन सरकार दरबारी जमा करावी, अन्यथा बेघरांना घर मिळावे, यासाठी आम्ही आंदोलन करू, असे सुतोवाच बच्चू कडू यांनी केले.बच्चू कडू माध्यमांशी बोलताना म्हणाले की, जो अंगरक्षक सचिन तेंडुलकरचे जीव वाचविण्याचे काम करत होता, त्याच अंगरक्षकाला सचिन

### आम्ही आंदोलन करू : बच्चू कडू

कापडे यांच्यामागे आई-वडील, पत्नी, दोन मुलगे असा परिवार आहे. कापडे हे गोरेगाव (मुंबई) येथे राज्य राखीव पोलीस दलात (एसआरपीएफ) प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. बच्चू कडू लोकसभा निवडणुकीबाबत बोलताना म्हणाले की, ही निवडणूक धर्मयुद्धासारखी लढली गेली. धर्म आणि जातीच्या नावावर निवडणुका लढल्या जात आहेत. सर्व मतदारसंघावर नजर मारली तर जातीचे गणित मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी हा प्रयत्न केला. मुळ मुद्द्यांपासून ही निवडणूक दूर गेली आहे. आजही मुंबईत सहा ते सात लाख लोकांना फुटपाथवर झोपावं लागतं आणि ६ हजार एकर जमीन सहा कुटुंबाकडे आहे. हा मुद्दादेखील निवडणुकीत यायला हवा होता. पण तो आला नाही. या विषयावर जून महिन्यात गोदरेजच्या मैदानावरच आंदोलन करणार आहोत. गोदरेज कुटुंबियांना ही जमीन ब्रिटिशांकडून मिळाली होती. त्यांनी ती जमीन सरकार दरबारी जमा करावी, अन्यथा बेघरांना घर मिळावे, यासाठी आम्ही आंदोलन करू, असे सुतोवाच बच्चू कडू यांनी केले.

करत असलेल्या जाहिरातीमुळे जीव गमवावा लागला आहे. अंगरक्षकाला आत्महत्या करायची वेळ अली असेल तर सचिन तेंडुलकरने ही जबाबदारी उचलली पाहीजे. भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या सुरक्षा व्यवस्थेतील राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) अंगरक्षक जवानाने १५ मे रोजी पहाटे जामनेर येथील निवासस्थानी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. गेल्या १५ वर्षांपासून राज्य राखीव पोलीस दलाच्या सेवेत असलेले प्रकाश कापडे (३९) यांनी याआधी मंत्री छगन भुजबळ, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याकडेही सुरक्षाव्यवस्थेतील अंगरक्षक म्हणून काम केले होते. सध्या ते सचिन तेंडुलकरच्या मुंबई येथील निवासस्थानी सुरक्षाव्यवस्थेत अंगरक्षक म्हणून तैनात होते. आठवडाभरापूर्वी ते जामनेर येथील गणपतीनगर भागातील आपल्या निवासस्थानी परतले होते. कापडे यांनी आत्महत्या केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला होता. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर आणइ तपासानंतर कारण स्पष्ट होईल.

# मनोज जरांगेंचा सरकारला इशारा!

## आमच्या लाखो पोरांवर गुन्हे दाखल करा :जरांगें

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाचा प्रश्न कायम आहे, आम्ही जागरुक आहोत. माझी महाराष्ट्रातल्या बांधवांना विनंती आहे की तुम्ही १०० टक्के मतदान करा, असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. तसंच मनोज जरांगेंनी ४ जूनसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे.**

मनोज जरांगेंनी मराठा बांधवांनाही हे आवाहन केलं आहे मतदान करा. तसंच ज्याला पाडायचं आहे त्या उमेदवाराला पाडा. आपण कुणालाही पाठिंबा दिलेला नाही असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे."मराठवाडा, विदर्भातले बांधव मला भेटून गेले. आमची चर्चा झाली. ३ जूनला सगळे येणार आहेत. कारण ४ जूनपासून मी आमरण उपोषण करणार आहे. पाठिंबा, पाठबळ देण्यासाठी हे सगळे येत आहेत. मी लढणार आहे, जोपर्यंत मराठा बांधवांना आरक्षण मिळत नाही तोपर्यंत मी कठोर आमरण उपोषण करणार आहे. ४ जून ही तारीख त्यासाठी नक्की झाली आहे. तीन महिन्यांपूर्वीच ही तारीख नक्की



झाली आहे. यामध्ये काहीही झालं तरीही बदल होणार नाही. माझ्या समाजाचा आग्रह आहे की मी उपोषण करु नये. मात्र मी उपोषणावर ठाम आहे. माझ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे ही माझी भूमिका आहे." असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळाल्याशिवाय मी शांत बसणार नाही असंही मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. मी राजकारणात पडणार

### तोपर्यंत मी शांत बसणार नाही

मी काही कुणाला पाडाही म्हटलं नाही आणि आणाही म्हटलं नाही. माझा समाज मला वाऱ्यावर सोडत नाही. माझ्या समाजाला न्याय देण्याचं काम मी करतो आहे. मी माझ्या जिवाची बाजी लावली आहे. माझा मराठा समाजाला शब्द आहे की जीव गेला तरीही मराठा आरक्षण मिळाल्याशिवाय मी मागे हटत नाही, आमच्या आया बहिणींवर हल्ले करा, लाखो पोरांवर केसेस दाखल करा पण आता आम्ही मागे हटणार नाही.

नाही. मी कुठूनही उभा राहणार नाही. माझ्यामागे राजकारणाचा काही विषय ठेवू नका. निवडणुकीला उभा राहणार नाही. जर सगेसोयऱ्यांची अमलबजावणी केली नाही तर मात्र १०० टक्के मराठा समाज मैदानात उतरणार आहे. मी देखील मैदानात उतरणार आहे. आरक्षण मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे.मी जर चौथ्या टप्प्यात प्रचार केला तर संताजी-धनाजींसारखा पाण्यात का दिसायला लागलो?

# 49 जागांसाठी 56.68% मतदान!

## ठाकरे गटाच्या 3 कार्यकर्त्यांना अटक; भाजप-टीएमसी समर्थक भिडले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**2024 लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात सोमवारी 6 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेशांमधील 49 जागांवर मतदान पार पडले. सायंकाळी 5 वाजेपर्यंत 56.68 टक्के मतदान झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक 73% आणि महाराष्ट्रात सर्वात कमी 48.66% मतदान झाले.**



याशिवाय ओडिशा विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील 35 जागांवर 48.95%, झारखंडच्या गांडे विधानसभेच्या जागेवर 53.82% आणि लखनौ पूर्व जागेवर 42.53% मतदान झाले. उत्तर प्रदेशातील महोबा येथे कर्तव्यावर असताना एका CRPF जवानाचा मृत्यू झाला. पश्चिम बंगालमधील बराकपूर आणि हुगळी येथे भाजप उमेदवार आणि टीएमसी समर्थकांमध्ये हाणामारी झाली आहे. मुंबईतील मतदान केंद्राजवळ डमी ईव्हीएम ठेवल्याप्रकरणी पोलिसांनी शिवसेनेच्या (यूबीटी) तीन कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याशिवाय गुलजार, सुभाष घई, अक्षय कुमार, नाना पाटेकर, अनिल कपूर, मनोज बाजपेयी, आरबीआय गव्हर्नर शक्तीकांता दास आणि अनिल अंबानी यांनी मुंबईत मतदान केले. याशिवाय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, बसपा सुप्रीमो मायावती, सतीश चंद्र मिश्रा यांनी लखनौमध्ये मतदान केले, राहुल गांधींच्या विरोधात लढणारे दिनेश प्रताप सिंह यांनी रायबरेलीत मतदान केले. लोकसभेच्या 543 जागांपैकी चौथ्या टप्प्यापर्यंत 380 जागांवर मतदान झाले आहे. आजच्या जागांसह एकूण 429 जागांवर मतदान पार पडणार आहे. उर्वरित दोन टप्प्यात 114 जागांवर मतदान होणार आहे. एनडीएचे उमेदवार आणि बिहारमधील सारण येथील खासदार राजीव प्रताप रुडी यांनी मतदानादरम्यान गैरप्रकार झाल्याची तक्रार केली आहे. अमनौर विधानसभा मतदारसंघातील बूथ क्रमांक 12, 13 आणि 14 बाबत खासदारांनी लेखी तक्रार केली आहे. तक्रारीत त्यांनी सारण विकास मंचचे निमंत्रक शैलेंद्र प्रताप सिंह यांच्यावर बूथ कॅप्चरिंगसारखे आरोप केले आहेत. यानंतर निरीक्षकांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. हुगळी लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार लॉकेट चॅटर्जी आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. भाजपचे उमेदवार लॉकेट चॅटर्जी म्हणाले- ते स्वत:ला तृणमूलचे एजंट म्हणवून मतदान केंद्रात बसले आहेत. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे ओळखपत्र नव्हते आणि ते लोकांना तृणमूलला मतदान करण्यास सांगत आहे. एडीआरने आपल्या अहवालात म्हटले आहे की निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील 695 उमेदवारांपैकी 227 म्हणजेच 33 टक्के उमेदवार कोट्यधीश आहेत. त्यांच्याकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक किमतीची संपत्ती आहे. उमेदवारांची सरासरी मालमत्ता 3.56 कोटी रुपये आहे. भाजपचे सर्वाधिक ३६ उमेदवार कोट्यधीश आहेत. एडीआरच्या अहवालानुसार, 159 उमेदवार आहेत ज्यांच्यावर खून आणि अपहरण यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी 3 उमेदवार कोणत्या ना कोणत्या प्रकरणात दोषी ठरले आहेत. 4 उमेदवारांवर खुनाचे तर 28 जणांवर खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल आहेत. २९ उमेदवारांवर महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. एका उमेदवाराविरुद्ध बलात्काराचा (IPC-376) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचवेळी 10 उमेदवारांविरुद्ध द्वेषयुक्त भाषणाशी संबंधित गुन्हे दाखल आहेत. याशिवाय ओडिशा विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील 35 जागांवर 48.95%, झारखंडच्या गांडे विधानसभेच्या जागेवर 53.82% आणि लखनौ पूर्व जागेवर 42.53% मतदान झाले. उत्तर प्रदेशातील महोबा येथे कर्तव्यावर असताना एका CRPF जवानाचा मृत्यू झाला. पश्चिम बंगालमधील बराकपूर आणि हुगळी येथे भाजप उमेदवार आणि टीएमसी समर्थकांमध्ये हाणामारी झाली आहे. मुंबईतील मतदान केंद्राजवळ डमी ईव्हीएम ठेवल्याप्रकरणी पोलिसांनी शिवसेनेच्या (यूबीटी) तीन कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याशिवाय गुलजार, सुभाष घई, अक्षय कुमार, नाना पाटेकर, अनिल कपूर, मनोज बाजपेयी, आरबीआय गव्हर्नर शक्तीकांता दास आणि अनिल अंबानी यांनी मुंबईत मतदान केले.

### खासदारांनी लेखी तक्रार केली

याशिवाय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, बसपा सुप्रीमो मायावती, सतीश चंद्र मिश्रा यांनी लखनौमध्ये मतदान केले, राहुल गांधींच्या विरोधात लढणारे दिनेश प्रताप सिंह यांनी रायबरेलीत मतदान केले. लोकसभेच्या 543 जागांपैकी चौथ्या टप्प्यापर्यंत 380 जागांवर मतदान झाले आहे. आजच्या जागांसह एकूण 429 जागांवर मतदान पार पडणार आहे. उर्वरित दोन टप्प्यात 114 जागांवर मतदान होणार आहे. एनडीएचे उमेदवार आणि बिहारमधील सारण येथील खासदार राजीव प्रताप रुडी यांनी मतदानादरम्यान गैरप्रकार झाल्याची तक्रार केली आहे. अमनौर विधानसभा मतदारसंघातील बूथ क्रमांक 12, 13 आणि 14 बाबत खासदारांनी लेखी तक्रार केली आहे.

# ऐन निवडणूक काळात सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले

## इसिसच्या चार दहशतवाद्यांना विमानतळावरून अटक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**इस्लामिक स्टेटच्या (इसिस) दहशतवाद्यांविरोधात भारतीय संरक्षण यंत्रणांना मोठं यश मिळालं आहे. गुजरातच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अहमदाबाद विमानतळावरून इसिसच्या चार दहशतवाद्यांना ताब्यात घेतलं आहे. एटीएसने अद्याप या चौघांची माहिती जाहीर केलेली नाही.**



या माहितीच्या आधारे एटीएस आणि इतर पोलीस कर्मचारी अहमदाबाद विमानतळावरच दबा धरून बसले होते. दहशतवादी विमानतळावर दाखल होताच एटीएसने त्यांना बेड्या ठोकल्या. एटीएसने या दहशतवाद्यांना कुठे नेलंय, दहशतवाद्यांचं अहमदाबादला येण्याचं उद्दीष्ट काय होतं? याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. या दहशतवाद्यांकडून मिळालेल्या तिकीटांवरून सूत्रांनी सांगितलं की ते चेन्नईवरून अहमदाबादला आले होते. चारही दहशतवादी आधी कोलंबोवरून चेन्नई आणि मग चेन्नईवरून अहमदाबादला आले होते. त्यांचे हँडलर भारतात त्यांना मार्गदर्शन करत होते. त्यामुळे एटीएस आता या हँडलर्सचा शोध घेत आहे. हे दहशतवादी चेन्नईमध्ये, अहमदाबादमध्ये ज्या-ज्या लोकांना भेटले होते त्यांच्यापासून आणि त्यांना भारतात मार्ग दाखवणाऱ्या हँडलर्सपासून देशाला मोठा धोका आहे. त्यामुळे गुजरात एटीएससह देशातील इतर संरक्षण यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. हे दहशतवादी अहमदाबादमध्ये त्यांच्या हँडलरच्या संदेशाची वाट पाहत होते. त्याआधीच एटीएसने त्यांच्या मुसक्या आवळल्या. या दहशतवाद्यांना पकडलं असलं तरी ऐन निवडणुकीत चार दहशतवादी भारतात घुसले होते, या बातमीने संरक्षण आणि गुप्तचर यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत.इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड लेव्हंट ही दहशतवादी संघटना गेल्या काही वर्षांपासून भारतात हातपाय पसरण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, भारतीय गुप्तचर यंत्रणा आणि संरक्षण यंत्रणांनी त्यांना अद्याप यशस्वी होऊ दिलेलं नाही. यावर्षी मार्च महिन्यात संरक्षण यंत्रणांनी आसाममध्ये इसिसच्या एका कमांडरला बेड्या ठोकल्या होत्या. त्याच्याबरोबर आसाममधील त्याच्या हँडलरलाही ताब्यात घेतलं होतं. इसिसचा हा कमांडर बांगलादेश-भारत सीमा ओलांडून भारतात घुसला होता.

### एटीएसने दहशतवाद्यांना बेड्या ठोकल्या

या माहितीच्या आधारे एटीएस आणि इतर पोलीस कर्मचारी अहमदाबाद विमानतळावरच दबा धरून बसले होते. दहशतवादी विमानतळावर दाखल होताच एटीएसने त्यांना बेड्या ठोकल्या.एटीएसने या दहशतवाद्यांना कुठे नेलंय, दहशतवाद्यांचं अहमदाबादला येण्याचं उद्दीष्ट काय होतं? याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. या दहशतवाद्यांकडून मिळालेल्या तिकीटांवरून सूत्रांनी सांगितलं की ते चेन्नईवरून अहमदाबादला आले होते. चारही दहशतवादी आधी कोलंबोवरून चेन्नई आणि मग चेन्नईवरून अहमदाबादला आले होते. त्यांचे हँडलर भारतात त्यांना मार्गदर्शन करत होते.

# दारु प्यायल्यानंतर अक्षय कुमार काय करतो?

बॉलीवूडच्या सुपरस्टार्समध्ये खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमारचं नाव घेतलं जातं. तो त्याच्या फिटनेस आणि हेल्थच्या बाबतीत कायमच गंभीर असतो. त्यासाठी तो दारु काय चहा सुद्धा पित नाही. पण एकदा अक्षयने खुलासा केला होता की, वाईन प्यायल्यानंतरही त्याला नशा चढते. तेव्हा तो काय करतो याबाबत एक मजेदार किस्सा देखील त्याने या कार्यक्रमादरम्यान सांगितला आहे. अक्षयने सलमान खानच्या दस का दम या कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्यावेळी त्याने याबाबत मजेशीर खुलासा केला आहे. यावेळी त्याने सांगितलं की, जेव्हा मला वाईन चढते तेव्हा मी जेवण बनवायला लागतो. अक्षयचा हाच व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. यामध्ये अक्षय कुमारने सांगितलं आहे की, त्याला थोडी वाईन जरी प्यायली तरी त्याची नशा चढते. पण त्याला नशा चढल्यावर तो गात किंवा नाचत नाही, तर जेवण बनवून त्याच्या बायकोला ट्रिंकल खन्नाला भरवतो. अक्षयच्या या उत्तरावर कार्यक्रमात एकच हशा पिकला. यावर बोलताना अक्षय कुमारनं म्हटलं की, मी थोडी जरी वाईन पिली तर ती मला चढते. नशेत लोकं खूप काही करतात. काही गातात, काही पडतात रागावतात पण मी जेवण बनवायला सुरुवात करतो. तेव्हा मी माझ्या लायकीवर येतो. खरतर अक्षय अॅक्टर बनण्याआधी शेफ होता. तो कॅनडामध्ये शेफ म्हणून काम देखील करत होता. अक्षयने सांगितलं की, मी फक्त कुकिंगच नाही करत तर ते मी बायकोला देखील भरवतो.

# पुष्पा 2 मधील लक्ष वेधणारा 'श्रीवल्ली'चा लूक

बॉक्स ऑफिसवर कोटींची कमाई केल्यानंतर पुष्पाचा सिक्वेल 'पुष्पा-2'प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातील अल्लू अर्जुनने साकारलेल्या पुष्पा या व्यक्तिरेखेसोबत रश्मिकाने साकारलेल्या श्रीवल्ली ही व्यक्तिरेखाही प्रेक्षकांना भावली होती. चित्रपटातील 'श्रीवल्ली' या गाण्याने चांगलाच धुमाकूळ घातला होता. आता रश्मिका मंदानाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'पुष्पा -2' निर्मात्यांनी श्रीवल्लीचा फर्स्ट लूक समोर आला आहे. पोस्टरमध्ये श्रीवल्लीने साडी नेसील असून ज्वेलरी परिधान केली आहे. कपाळावर असलेल्या कुंकूने आणि गळ्यात असणाऱ्या डोरल्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. रश्मिकाच्या डोळ्यात काहीसा आक्रमकपणा आहे. लोकांचे हृदय चोरणारी श्रीवल्ली उर्फ रश्मिकाला वाढदिवसाच्या शुभेच्छा अशी कॅप्शन देण्यात आली आहे. चाहत्यांकडून रश्मिकाच्या या लूकवर कौतुकाचा वर्षावर सुरू आहे. एका युजरने श्रीवल्ली असे लिहित फायर इमोजी पोस्ट केली आहे. अनेक चाहत्यांनी हार्ट आणि फायर इमोजी पोस्ट करत आहेत. अल्पावधीतच लाखो लोकांनी या पोस्टला लाईक केले आहे.'पुष्पा 2 द रुल'चा टीझर रिलीजसाठी तयार आहे. या चित्रपटाचा टीझर 8 एप्रिल रोजी लॉंच होणार आहे. श्रीवल्लीच्या फर्स्ट लूकसह निर्मात्यांनी ही माहिती दिली आहे. 'पुष्पा 2' मध्ये अल्लू अर्जुन, फहद फासिल, रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

# सुंदर गातात डॉ. नेने

अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि तिचे पती डॉ. श्रीराम नेने बॉलीवूडमधील लोकप्रिय जोडपं. दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते व्हिडिओ व फोटो शेअर करत असतात. डॉ. नेनेंनी आता त्यांच्या एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यात ते दोघेही एड शीरनचं लोकप्रिय गाणं गाताना दिसत आहेत. डॉ. नेनेंनी इन्स्टाग्रामवर त्यांचा व माधुरीचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. यात माधुरी एड शीरनचं 'परफेक्ट' गाणं गाताना दिसते. नंतर डॉ. नेनेही तिच्याबरोबर हे गाणं म्हणतात. 'आमच्या आवडत्या गाण्यांपैकी एक 'परफेक्ट' गाताना नेहमी खूप मजा येते' असं कॅप्शन डॉ. नेनेंनी या व्हिडिओला दिलं आहे. याचबरोबर त्यांनी एड शीरनला टॅगही केलं आहे.डॉ. नेने व माधुरीच्या या व्हिडीओवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. दोघांनी खूप छान गाणं गायलं, असं चाहते म्हणत आहेत. 'किती गोड,' 'माहित नव्हतं डॉ. नेने इतकं छान गातात', 'खूप छान', 'गाणं खूप आवडलं' अशा कमेंट्स या व्हिडीओवर आहेत.माधुरी दीक्षितच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास जानेवारीमध्ये तिचा मराठी सिनेमा 'पंचक' प्रदर्शित झाला होता. माधुरी व डॉ. नेने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली होती. माधुरी सध्या 'डान्स दिवाने' चं परीक्षण करत आहे.



# नेत्रा करणार अस्तिकाचा शेवट

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' ही मालिका सध्या रंजक वळणावर आहे. तसेच लवकरच या मालिकेत मोठी ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. कारण लवकरच त्रिनयना देवी अस्तिकाचा शेवट करणार आहे. अस्तिक विरोचकाने दिलेला काळा मणी तिच्याकडे असल्यामुळे सुरक्षित रहात होती. पण ही गोष्ट नेत्राला कळते आणि ती हीच गोष्ट अद्वैतला सांगते. त्याचवेळी रुपालीसुद्धा अस्तिकाला सांगते की अव्दैत-नेत्रा दोघे मिळून तुझा वध करण्याचा प्रयत्न करतील. सध्या मालिकेत अस्तिका ही नेत्रा म्हणून वावरत आहे. त्याचप्रमाणे ती नेत्राला त्रिनयना देवीच्या मूर्तीच्या जागी विरोचकाची मूर्ती आणण्याचं देखील आव्हान देते. पण नेत्रा मात्र अस्तिकाला जशासं तसं उत्तर देते. त्याचसाठी नेत्रा आणि अद्वैत मिळून अस्तिकाचा वध करण्याची योजना आखत असतात. घरातले सगळेजणही त्यांना साथ देतात. पण रुपाली अस्तिकाला सांगते की, ते तुला संपण्याआधीच तू अद्वैतचा जीव घे आणि नागरुपात येऊन खोलीत लपून रहा. दरम्यान रुपालीच्या सांगण्यामुळे अस्तिका पूर्णपणे गोंधळून जाते. काय करावं हेच तिला कळत नाही. त्यानंतर ती अद्वैतच्या प्रेमळ बोलण्यात अडकते. तरीही रूपाली अस्तिकाला अव्दैतच्या जाळ्यातून सोडवते आणि तिला सांगते, की अव्दैतला पुन्हा मारण्याचा प्रयत्न कर.नेत्रा विरोचकाची खेळी पूर्णपणे ओळखते आणि घरातल्या सर्वांना एकत्र रहा असं सांगते. त्यानंतर नेत्रा अस्तिकाचा वध करण्यासाठी काय मार्ग असू शकेल, यावर विचार करते.'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मध्ये विरोचक आणि त्रिनयना देवीच्या मुलींमध्ये युद्ध होईल. या युद्धात विरोचकाचा शेवट झाल्यानंतर मालिकेचा शेवट होईल असेही त्यांनी सांगितले. विरोचक संपल्यानंतर मालिकेला काही अर्थच राहणार नाही, त्यामुळे मालिका संपू शकते असा अंदाज त्यांनी वर्तवला.

# लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का?

ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे. या सिनेमावरुन बरीच उलटसुलट चर्चा झाली. तसंच सिनेमाचा ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा त्यातल्या एका संवादावरुन रश्मिका मंदानाला चांगलंच ट्रोल करावं लागलं. या ट्रोलिंगवर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. ट्रेलरमध्ये जो प्रसंग दाखवण्यात आला होता त्यात रश्मिका मंदाना करवा चौथच्या दिवशी रणबीरवर चांगलीच चिडलेली असते. तसंच रागाच्या भरात ती एक वाक्य बोलून जाते ज्यानंतर रणबीर चिडतो. जे वाक्य ती बोलत असते त्याचा काहीही संदर्भ लागला नसल्याने रश्मिका मंदानाला खूप ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. अगदी ती काय बोलते ते समजत नसल्यापासून ते तिने तोंडात सुपारी ठेवून संवाद म्हटला आहे का? इथपर्यंत अनेक प्रकारे तिला ट्रोल केलं गेलं. या सगळ्या प्रकारावर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. नेहा धुपियाच्या नो फिल्टर नेहा या टॉक शोमध्ये रश्मिका आली होती. त्या शोमध्येच तिने या मुद्द्यावर मौन सोडलं आहे."करवा चौथचा तो प्रसंग नऊ मिनिटांचा होता. तो सीन शूट करताना सेटवर जितके लोक होते त्या सगळ्यांना आवडला होता. नऊ मिनिटांचं ते शूट संपल्यावर सगळ्यांनीच टाळ्या वाजवल्या. तो सीन खूप चांगल्या प्रकारे शूट झाला असं सगळ्यांनीच सांगितलं. ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा एका डायलॉगवरुन मला प्रचंड ट्रोल करण्यात आलं. तेव्हा मी असा विचार केला की नऊ मिनिटांचा तो इतका लांबलचक सीन सेटवरच्या लोकांना आवडला होता, मग आता लोक आपल्याला ट्रोल का करत आहेत? मी जणू काही स्वतःभोवती एखादा फुगा फुगवून घेतला होता का? लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का? तुम्ही काय शूट केलं आहे ते लोकांना माहीत नसतं. त्यांनी १० सेकंदाचा तेवढा एक डायलॉग पाहिला आणि मला ट्रोल करायला सुरुवात केली." असं रश्मिकाने म्हटलं आहे. लोकांनी महिलेला तिच्या शरीरावरुन ट्रोल करणं, बॉडी शेमिंग ज्याला आपण म्हणतो ते मला मुळीच आवडत नाही. आता एखाद्या महिलेच्या शरीरावरुन तिला ट्रोल करता येत नसेल तर चित्रपट, त्यातला पेहराव, त्यातली भाषा, संवाद यावरुन ट्रोलिंग होतं. मी कसा परफॉर्मन्स दिला आहे हे मला माहीत आहे असं रश्मिका मंदानाने म्हटलं आहे.ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे.



# रोहित शर्मा खोटं बोलला?

## » स्टार स्पोर्ट्सने हिटमॅनला दिले चोख प्रत्युत्तर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**रोहित शर्मा आणि स्टार स्पोर्ट्सचे प्रकरण आता वेगळ्या पातळीवर पोहोचताना दिसत आहे. रोहित शर्माने काही दिवसांपूर्वी आरोप केला होता की त्याचे वैयक्तिक संभाषण देखील टीआरपीसाठी प्रसारित केले गेले होते, परंतु त्याने त्यास नकार दिला होता. मात्र आता स्टार स्पोर्ट्सने मुंबई इंडियन्सच्या माजी कर्णधाराला प्रत्युत्तर दिले आहे. स्टार स्पोर्ट्सने एक निवेदन जारी केले असून त्यात त्यांनी रोहित शर्माचे आरोप स्पष्टपणे फेटाळले आहेत. स्टार स्पोर्ट्सने म्हटले आहे की, त्यांनी रोहित शर्माचा कोणताही ऑडिओ ऑन एअर चालवलेला नाही.**

रोहित शर्माला उत्तर देताना स्टार स्पोर्ट्सने सांगितले की, “रोहित शर्माच्या संभाषणाची क्लिप १६ मे वानखेडे स्टेडियममधील आहे. ती क्लिप प्रसारित करण्याचे अधिकार स्टार स्पोर्ट्सकडे होते. त्या व्हिडीओमध्ये रोहित शर्मा त्याच्या मित्रांसोबत बोलत होता. आम्ही त्या क्लिपचा कोणताही ऑडिओ किंवा संभाषण रेकॉर्ड किंवा प्रसारित केले नाही. तो व्हिडीओ फक्त प्री-शोसाठी वापरला होता, पण त्यात ऑडिओ रेकॉर्ड नव्हता.”रोहित शर्माचा व्हिडिओ आणि ऑडिओ केकेआरने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केला होता. त्या व्हिडीओवरून झालेल्या वादानंतर केकेआरने तो सोशल मीडियावरून हटवला. या ऑडिओमुळे रोहित शर्माला खूप त्रास झाला आणि त्यामुळेच त्याने सोशल मीडियावर थेट स्टार स्पोर्ट्सवर मोठे आरोप केले. मात्र, चॅनलने स्पष्टपणे म्हटले आहे की ते खेळाडूंच्या गोपनीयतेचा आदर करतात.रोहितने सोशल मीडियावर पोस्ट करताना लिहिले होते की, “खेळाडूंच्या आयुष्यातल्या खाजगी गोष्टी जाहीर केल्या जात आहेत. कॅमेरे तुमचे प्रत्येक बोलणे, हावभाव, कृती टिपत आहेत. तुम्ही मित्रांबरोबर, घरच्यांबरोबर, संघातील सहकाऱ्यांबरोबर, सरावावेळी जे जे बोलता ते सगळं टिपले जात आहे. मी बोलत असताना रेकॉर्ड करू नका अशी विनंती करुनही स्टार स्पोर्ट्सने चित्रीकरण केले. नुसते चित्रीकरण



करून थांबले नाहीत तर ते प्रसारितही केले. हा गोपनीयतेचा भंग आहे”. त्याने पुढे लिहिले की, ‘त्यांना एक्सक्लुसिव्ह कंटेंट हवा आहे. व्ह्यूज हवे आहेत, एंगजेमेंट हवी आहे. पण या सगळ्याच्या नादात तुम्ही चाहते, खेळाडू आणि क्रिकेट यांच्यातला विश्वासाला तडा घालवत आहात.”भारतीय संघाचा कर्णधार आणि मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज रोहित शर्मा आणि स्टार स्पोर्ट्स यांच्यातील वाद आता वेगळ्याच वळणावर येऊन ठेपला आहे. रोहित शर्माने ट्वीट करून दोन दिवसांपूर्वी नाराजी व्यक्त केली होती. रोहित शर्माने आरोप केला होता की, खासगी चर्चा टीआरपीसाठी ऑनएअर केली जात आहे. मनाई करूनही ऑनएअर केल्याने रोहित शर्माने नाराजी व्यक्त केली होती. पण आता स्टार स्पोर्ट्सने भारतीय कर्णधार रोहित शर्माला जसाच तसं उत्तर दिलं आहे. स्टार स्पोर्ट्सने उत्तर देत रोहित शर्माने केलेले सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. स्टार स्पोर्ट्सने सांगितलं की, त्यांनी रोहित शर्माचा कोणताही ऑडिओ ऑनएअर चालवलेला नाही. स्टार स्पोर्ट्सने रोहित शर्माला उत्तर देताना सांगितलं की,“रोहित शर्माच्या चर्चेची क्लिप 16 मे वानखेडे स्टेडियममधील आहे. स्टार स्पोर्ट्सकडे ही क्लिप प्रसारित करण्याचे हक्क होते. त्या व्हिडीओत रोहित शर्मा आपल्या मित्रांसोबत चर्चा करत होता. आम्ही तेव्हा कोणताही ऑडिओ आणि कोणतीही चर्चा रेकॉर्ड केली नाही. तसेच प्रसारितही केली नाही. त्या व्हिडीओचा वापर फक्त प्री-शोसाठी झाला होता. पण त्यात कोणताही ऑडिओ नव्हता.”रोहित शर्माचा व्हिडीओ आणि ऑडिओ क्लिप केकेआरने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केला होता. त्या व्हिडीओवरून वाद झाल्यानंतर केकेआरने तो व्हिडीओ सोशल मीडियावरून डिलीट केला. रोहित शर्माला या ऑडिओमुळे सर्वाधिक त्रास झाला. त्यानंतर त्याने सोशल मीडियावरून सरळ ब्रॉडकास्टरवर आरोप केला होता. पण स्टार स्पोर्ट्स चॅनेलने आता स्पष्टीकरण देत सांगितयानंतर त्याला विचारलं की पुढं काय?”आयपीएलचा 17 वा हंगाम निराशाजनक ठरला आहे. मुंबईनं 14 मॅचपैकी केवळ 4 सामन्यांमध्ये विजय मिळवला तर त्यांना दहा सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. दहा पराभवांमुळं मुंबई इंडियन्स सध्या गुणतालिकेत दहाव्या स्थानावर आहे.

### आपलं नेमकं काय चुकले

मुंबई इंडियन्ससाठी आयपीएलचा 17 वा हंगाम निराशाजनक ठरला आहे. मुंबईनं 14 मॅचपैकी केवळ 4 सामन्यांमध्ये विजय मिळवला तर त्यांना दहा सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. दहा पराभवांमुळं मुंबई इंडियन्स सध्या गुणतालिकेत दहाव्या स्थानावर या खेळाडूंचे मनोबल उंचावण्यासाठी ड्रेसिंग रुममध्ये पोहोचल्या आणि त्यात त्यांनी रोहितला शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या, “आपल्याला जसे अपेक्षित होते, तसे हे पर्व गेले नाही. पण, तरीही मी मुंबई इंडियन्सची मोठी चाहती आहे. हे मी फक्त मालक म्हणून नाही बोलत आहे. मुंबई इंडियन्सची निळी जर्सी परिधान करणे हे खूप मोठं भाग्य आहे आणि या फ्रँचायझीची मालक असण्याचा मलाही अभिमान आहे. हे मी माझे भाग्य समजते. आपलं नेमकं काय चुकले, यावर चर्चा होईल.

---

# प्लेऑफ्स सामन्यांसाठी राखीव दिवस आहे का?

## » प्लेऑफ्स सामना रद्द झाल्यास कोणाला होणार फायदा?

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आयपीएल २०२४ मधील सर्व ७० साखळी सामने रविवारी पाडले. हंगामातील शेवटचा साखळी सामना राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार होता, तो पावसामुळे रद्द करण्यात आला. ज्यामुळे प्लेऑफ्ससाठी पात्र ठरलेल्या ४ संघाचे गुणतालिकेतील स्थान निश्चित झाले. आता प्लेऑफचे सामने होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे प्लेऑफ्समध्ये एकूण ४ सामने खेळवले जाणार आहेत. यापैकी एलिमिनेटर सामना २२ मे रोजी आरसीबी आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळवला जाणार आहे.**

जर हा सामना पावसामुळे रद्द झाला तर दुसरा क्वालिफायर सामना कोण खेळणार? याबद्दल जाणून घेऊया.आयपीएल २०२४ वर पावसाचे संकट निर्माण झाले आहे. या हंगामात आतापर्यंत एकूण ३ सामने पावसामुळे रद्द झाले आहेत. अशा स्थितीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील एलिमिनेटर सामन्याआधीच करोडो चाहत्यांच्या मनात एक प्रश्न उपस्थित होत आहे की, हा सामनाही पावसामुळे रद्द झाला, तर ट्रॉफीच्या या शर्यतीत कोण राहणार आणि कोण? या शर्यतीतून बाहेर पडणार?आयपीएल २०२३ च्या हंगामापर्यंत, प्लेऑफ सामन्यांसाठी कोणताही राखीव दिवस नव्हता, तो फक्त आयपीएलच्या अंतिम




सामन्यासाठी ठेवण्यात आला होता. पण या हंगामापासून एलिमिनेटर सामना आणि क्वालिफायर सामन्यांसाठीही राखीव दिवस ठेवण्यात आले आहेत आहे. अशा परिस्थितीत आरसीबी आणि आरआर यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्यास हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल.राखीव दिवशीही हवामान सहकार्य करत नाही असे मानू या, तर पंच किमान ५-५ षटकांचा सामन आयोजित करण्याचा प्रयत्न करतील. हेही शक्य नसेल तर सुपर ओव्हर घेण्यात येईल. मात्र सुपर ओव्हर्सचा पण सामना खेळला गेला नाही, तर कोणता संघ क्वालिफायर खेळणार, हे पॉइंट टेबलवर ठरवले जाईल. गुणतालिकेत दोन्हीपैकी जो संघ अव्वल स्थानावर राहिला होता, तो संघ दुसरा क्वालिफायर खेळण्यासाठी पात्र ठरेल. त्याचबरोबर दुसरा संघ बाहेर पडेल. या नियमामुळे आरसीबीला मोठा फटका बसणार आहे. जर सामना रद्द झाला, तर आरसीबी संघ बाहेर पडेल आणि राजस्थान रॉयल्स पुढच्या फेरीत म्हणजे दुसरा क्वालिफायर सामना खेळेल.जर हा सामना पावसामुळे रद्द झाला तर दुसरा क्वालिफायर सामना कोण खेळणार? याबद्दल जाणून घेऊया.आयपीएल २०२४ वर पावसाचे संकट निर्माण झाले आहे.

### 5-5 षटकांचा सामन आयोजित ?

चाहत्यांच्या मनात एक प्रश्न उपस्थित होत आहे की, हा सामनाही पावसामुळे रद्द झाला, तर ट्रॉफीच्या या शर्यतीत कोण राहणार आणि कोण? या शर्यतीतून बाहेर पडणार?आयपीएल २०२३ च्या हंगामापर्यंत, प्लेऑफ सामन्यांसाठी कोणताही राखीव दिवस नव्हता, तो फक्त आयपीएलच्या अंतिम सामन्यासाठी ठेवण्यात आला होता. पण या हंगामापासून एलिमिनेटर सामना आणि क्वालिफायर सामन्यांसाठीही राखीव दिवस ठेवण्यात आले आहेत आहे. अशा परिस्थितीत आरसीबी आणि आरआर यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्यास हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल.राखीव दिवशीही हवामान सहकार्य करत नाही असे मानू या, तर पंच किमान ५-५ षटकांचा सामन आयोजित करण्याचा प्रयत्न करतील.